# राशिभविष्य - जून, २०२०.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==========================================================

**सूचना - प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी त्या त्या जन्मनक्षत्राचा तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार, अन्य समस्या यांचे निवारण होते, असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास कृपया कळवावे, ही विनंती.**

==========================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत हर्षल असून त्याच्यामुळे या काळात या राशीच्या मंडळींचा स्वभाव लहरी, चंचल, अस्थिर असा होणे संभवते. कोणी काही समजुतीच्या चार गोष्टी सांगितल्या तर तो अपमान वाटून संतप्त व्हाल. या राशीची लहान मुले तर या काळात अतिशय वांड, खोडकर, झाली असल्याचा अनुभव येत असेल. असे असले तरी हा हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या धनस्थानी स्वराशीत शुक्र व त्याच्याबरोबर रवि ग्रह आहे. हा रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील. शिवाय घरात वाद, भांडणे होणेही संभवते. काही मंडळींना डोळ्याचे आजार त्रस्त करतील. जपा. पण शुक्रामुळे परिस्थिती फारशी बिघडणार नाही व कुटुंबात काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या तृतीय स्थानी राहू व बुध असून महिन्याच्या उत्तरार्धात या स्थानी रवि ग्रह येत आहे. हा रवि ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात अनुकुल होईल, त्याला राहूची साथ मिळेल व मनस्थिती हरहुन्नरी होईल, हातून पराक्रमी कर्तृत्व घडेल, रविमुळे आरोग्य सुधारेल, नोकरीत सुखसमाधान लाभेल. वरिष्ठ तुमच्या कर्तृत्वावर प्रसन्न होतील. काही मंडळींना बढती, पगारवाढ, तर क्वचित कोणास एखादे मानाचे स्थान वा उच्च पद मिळणेही शक्य दिसते. या राशीच्या भाग्यस्थानी केतु असल्यामुळे संततिसुखात बाधा येण्याची शक्यता आहे. जपा. तसेच या केतूमुळे या राशीच्या काही मंडळींचे आचरण ढोंगी, धूर्त, दिखाऊ असे घडण्याची शक्यता आहे. या राशीच्या दशम स्थानी मकर या शनीच्याच राशीत शनि असून या शनीसह गुरु ग्रहही दशाम स्थानी आहे. पण मकर ही गुरु ग्रहाची नीच राशी असल्यामुळे बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना फारसा अनुकुल होणे संभवत नाही. पण शनि लोखंड, पोलाद, कोळसा यांचा व्यापार असणारांना अनुकुल , प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत मंगळ व नेपच्यून असून हे दोन्ही ग्रह फारसे अनुकुल होणार नाहीत. पण येथील मंगळामुळे काही मंडळींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे संभवते. नेपच्यूनमुळे अर्थप्राप्तीस विलंब, आर्थिक नुकसान, आर्थिक घोटाळ्याचा त्रास अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप होणे संभवते. त्यामुळे नैराश्य येण्याची शक्यताही नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत काही मंडळींना कुमार्गी मित्राची बाधा होणेही संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात येथील मंगळ या राशीच्या व्ययस्थानी गेल्यावर पूर्णपणे अशुभ होईल व त्यामुळे वाद, भांडणे, आर्थिक चिंता, मानहानी अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज स्नान करताना जन्मनक्षत्र

अश्विनी असणारांनी " ओम अश्विनीकुमाराभ्याम नमः::" मंत्राचा, भरणी जन्मनक्षत्र असणारानी " ओम यमाय नमः:" मंत्राचा तर कृत्तिका जन्मनक्षत्र असणारांनी " ओम अग्नये नमः: " मंत्राचा श्रद्धेने १०८ वेळा जप करावा. तसेच स्नान झाल्यावर "श्रीगणेश अथर्वशीर्षा"चे पठण करावे. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करावे.

**(२) वृषभ -** या राशीच्या प्रथम स्थानी स्वराशीत शुक्र ग्रह असून महिन्याच्या पूर्वार्धात रवि ग्रह त्याच्या बरोबर आहे. शुक्र अनुकुल असला तरी रवि ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल असणार आहे. त्यामुळे मानसिक चिंता, शारीरिक अनारोग्य, काही मंडळींना डोळ्याचे दुखणे, काहींना रक्तदाब तर काहींना हृदयविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. त्याशिवाय भांडणे होणे, आर्थिक समस्या त्रस्त करणे, अशापैकी मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. पण शुक्रामुळे वॆवाहिक जीवनातील सुख मिळेल. व मधून मधून काही मनोनुकुल घटना घडतील. या राशीच्या धनस्थानी राहू व बुध असून ते दोन्ही ग्रह कौटुंबिक सुखात बाधा निर्माण करतील. पण बुधामुळे काही प्रमाणात अर्थलाभ होणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी धनु राशीत केतू असून त्याच्यामुळे काही मंडळींना मुखदंत रोग, काहींना त्वचारोग तर क्वचित कोणास रक्तविकाराचा आजार होणे संभवते. शिवाय हा केतू कौटुंबिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यताही दिसते. त्याशिवाय अपघात भय असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. या राशीच्या भाग्यस्थानी मकर या स्वतः:च्या राशीत शनि ग्रह असून त्याच्यासोबत गुरु ग्रहही आहे. पण ही गुरु ग्रहाची नीच राशी असल्यामुळे येथील गुरु अशक्त आहे. त्यामुळे तो अपेक्षेनुसार फलदायी होणार नाही. तो आध्यात्मिक प्रगतीस अनुकुल होईल. प्रवासाचे योग येतील. या राशीच्या दशम स्थानी कुंभ या बौद्धिक राशीत मंगळ व नेपच्यून असे दोन ग्रह आहेत. पैकी मंगळ ग्रह औषधविक्रेते, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना अनुकूल होईल; पण इतर नोकरी-व्यवसाय असणारांच्या मार्गात खळबळजनक अडथळे अडचणी निर्माण करील. नोकरदार मंडळींना कामाचा ताण सहन करावा लागेल. वरिष्ठांशी भांडणे होतील. त्यामुळे काही मंडळींना नोकरी सोडून इतर काही करावेसे वाटेल. पण त्यांनी तो विचार मनातून काढून टाकावा. सहनशील बनून आहे ती नोकरीच मनापासून करावी. पण येथील इतर व्यावसायिकांना प्रतिकुल असला तरी मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थांचे व्यापारी यांना अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात मंगळ ग्रह या राशीच्या लाभस्थानी जात आहे. त्यामुळे मित्राशी वितुष्ट येणे संभवते. पण काही मंडळींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही संभवते. या राशीच्या व्ययस्थानी हर्षल असून तो अत्यंत प्रतिकुल होईल. त्याच्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील. काहींना
वाईट प्रसंगाशी तर कोणास जीवावरच्या प्रसंगाशी मुकाबला करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. त्याशिवाय अकारण शत्रुत्व निर्माण होणेही संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीशिव शंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना या राशीच्या ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" मंत्राचा, जन्मनक्षत्र रोहिणी असणारांनी " ओम ब्रह्माय
नमः:" मंत्राचा व मृग जन्मनक्षत्र असणारानी "ओम सोमाय नमः: " मंत्राचा १०८ वेळा श्रद्धेने जप करावा स्नान झाल्यावर" शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करावे. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचलीसा स्तोत्रा"चे पठण करावे.

**(३) मिथुन -** या राशीच्या प्रथम स्थानी राहू व बुध असून महिन्याच्या उत्तरार्धात व्ययस्थानी असलेला रवि ग्रह प्रथम स्थानी येत आहे. हे तिन्ही ग्रह या महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल असणार असून राहूमुळे अपमान होणे, डूख धरणे, वातविकार बळावणे अशा प्रकारचे मनस्तापदायक अनारोग्य होणे संभवते. बुध ग्रहामुळे मनस्थिती चंचल होईल व त्यामुळे मित्रद्रोह होणे, कुसंगतीचा संसर्ग होणे व त्यामुळे आर्थिक नुकसान होणे संभवते. या महिन्याच्या संपूर्ण काळात रवि ग्रह प्रतिकुल होणार असून तो या राशीच्या प्रथम स्थानी आल्यावर चिंता, मनस्ताप व शारीरिक-मानसिक अनारोग्य होणे, हाती घेतलेल्या कामात पीछेहाट होणे संभवते. अशा परिस्थितीत रक्तदाब, हृदयविकार असे आजार असलेल्यांनी सहनशील बनून मन सतत शांत ठेवण्याचा प्रयत्न करणेच अगत्याचे होईल. पण व्ययस्थानी स्वराशीत असलेल्या शुक्र ग्रहामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील, वॆवाहिक जीवनातील सुख मिळेल व त्यामुळे प्रतिकुल काळ सुसह्य होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या केतूमुळे मनस्थिती अस्वस्थ राहून हाती घेतलेल्या कामात अपयश येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी मकर या स्वराशीत शनि व गुरु असे दोन ग्रह असून मकर ही गुरु ग्रहाची नीच राशी असल्यामुळे हे दोन्ही ग्रह प्रतिकुलच होतील व त्यामुळे मनस्ताप अनारोग्य, अपेक्षाभंग, असमाधानकारक घटना घडणे संभवते. पण ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना काही प्रमाणात असा धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा धनलाभ होऊ शकेल. या राशीच्या भाग्यस्थानी मंगळ व नेपच्यून असे दोन ग्रह असून नेपच्यून ग्रह अध्यात्माची मनापासून ओढ असणारांना अनुकुल होईल व उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील; तर काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. पण मंगळामुळे प्रवासात मानहानी होणे, मनस्ताप होणे संभवते. जपा. येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर या राशीच्या नोकरदार मंडळींना व स्वतंत्र व्यवसाय असणारांना प्रतिकुल होईल. नोकरीत वरिष्ठांचा त्रास व व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता आहे. पण केवळ औषध विक्रेते आणि यांत्रिकतांत्रिक नोकरी -व्यवसाय असणारांना काही प्रमाणात अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या लाभस्थानी हर्षल असून त्याच्यामुळे मित्रांशी भांडणे होणे संभवते.. पण तो धनलाभदायक होणेही शक्य आहे. श्रद्धा असेल तर दररोज सकाळी स्नान करताना मृग जन्मनक्षत्र असणारांनी “ओम सोमसोमाय नमः:” मंत्राचा, आर्द्रा जन्मनक्षत्र असणारांनी “ओम शंकराय नमः: “मंत्राचा, तर पूनर्वसू जन्मनक्षत्र असणारांनी “ओम अदितीये नमः:” मंत्राचा १०८ वेळा जप करावा. तसेच श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करावी. दररोज स्नान झाल्यावर “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करावे.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात राहू-केतू हे दोन्ही ग्रह अनुकुल असून राहूमुळे हितशत्रूंपासून रक्षण होईल, अर्थलाभ होणेही संभवते. शिवाय काही मंडळींना परदेशगमनाची संधीही मिळेल. पण हा राहू वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. जपा. केतूमुळे सर्वप्रकारचे आरोग्य उत्तम राहील, व्यवसायात सहकार्य लाभेल, काही मंडळींना कीर्ती-प्रसिद्धी मिळणेही संभवते. पण व्ययस्थानी राहूसह बुध ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह व्ययस्थानी जात आहे. या बुध ग्रहामुळे अनारोग्य, मानहानी, हाती घेतलेल्या कामात अपयश येणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह व्ययस्थानी आल्यावर प्रतिकुल होणार असल्यामुळे मनस्थिती अस्वस्थ राहील, कसली तरी चिंता त्रस्त करील, हाती घेतलेल्या कार्यात अपयश येईल

व त्यामुळे नैराश्य येईल. पण लाभस्थानी असलेल्या शुक्र ग्रहामुळे मधून मधून मनोनुकुल व लाभदायक घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या दशम या नोकरी-व्यवसाय स्थानी मेष राशीत हर्षल असून बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना हा हर्षल अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी शनि -गुरु असे दोन ग्रह असून गुरु ग्रह नीच , अशक्त असल्यामुळे फारसा अनुकुल होईल असे वाटत नाही. या गुरु ग्रहामुळे ज्यांना विवाहयोग येईल त्यांचा विवाहयोग काही अपरिहार्य कारणाने लांबणीवर पडण्याची शक्यता दिसते. इतर सर्वच बाबतीत विलंब होणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी मंगळ व नेपच्यून असे दोन ग्रह असून महिन्याच्या पूर्वार्धात येथील मंगळ अनारोग्यकारक व अपघातभयकारक होईल. जपा. या मंगळामुळे मूळव्याधीसारखे उष्णताविकाराचे आजार त्रस्त करतील. हा मंगळ अपघातकारक असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. हाडमोड होणे संभवते. तसेच हा मंगळ पाण्यापासून व विजेपासून धोका असल्याचे सुचवतो. येथील नेपच्यून सुद्धा जलभयकारक व विषभयकारक आहे. त्यामुळे जलप्रवास करू नका, खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. विजेची उपकरणे सावधानतेने हाताळा व बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. महिन्याच्या उत्तरार्धात हा मंगळ या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात मनस्ताप, मानहानी होणे संभवते. श्रद्धा असेल तर दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी " ओम श्रीआदितीये नमः:" मंत्राचा, पुष्य जन्मनक्षत्र असणारांनी "ओम बृहस्पतये नमः:" मंत्राचा व आश्लेषा जन्मनक्षत्र असणारांनी "ओम सर्पाय नमः:" मंत्राचा १०८ वेळा श्रद्धेने जप करावा. तसेच स्नान झाल्यावर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची व श्रीशिवशंकराची उपासना करावी. "शिवलीलामृतस्तोत्रा"चे व "बावन्नश्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करावे. त्यामुळे मनशक्ती व मन:शांती लाभेल.

**(५) सिंह -** या राशीच्या दशम स्थानी रवि व शुक्र असे दोन ग्रह असून येथील रवि ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी जाईल. हा रवि ग्रह या महिनाच्या संपूर्ण काळात या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व विविध प्रकारे लाभदायक होईल. काही मंडळींना बढती मिळेल, पगारवाढ होईल. क्वचित कोणास उच्च पद किंवा मानाचे स्थान मिळणेही शक्य आहे. त्यामळे प्रतिष्ठा वाढेल. थोरामोठयांच्या ओळखी होतील. आरोग्य चांगले राहील. शुक्रामुळे स्वतंत्र व्यापार, व्यवसाय असणारांच्या व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते पण सर्व प्रकारच्या कलावंत मंडळींना हा शुक्र प्रगतिकारक व सुखकारक होईल. लाभस्थानी असलेल्या बुधामुळे काही मंडळींना धनलाभ तर काहींना मित्रलाभ होणे संभवते. त्यामुळे सुखसमाधान लाभेल. तसेच राहूमुळे काही मंडळींना अधिकारपद मिळाले तरी त्याचा गैर उपयोग करून वाममार्ग धन प्राप्तीचा मोह होईल. जपा. जुगाराचा नाद असेल तर त्यात नुकसानच होईल. शिवाय हा राहू संतति विषयक चिंता निर्माण करण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या पंचम स्थानी असलेला केतूही अनारोग्यकारक होणे संभवते. तसेच या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत विविध कारणांनी अडचणी, अडथळे निर्माण होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना प्रगतिकारक होईल. त्याचप्रमाणे त्याच्यामुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या षष्ठ स्थानी स्वराशीत शनि ग्रह व गुरु ग्रह असे दोन ग्रह आहेत. ते दशम या नोकरीव्यवसाय स्थानास पूरक होतील. पण शनीमुळे गैरसमज, भांडणे, शत्रुत्व निर्माण होणे संभवते. तसेच अनारोग्याचा त्रास होणेही शक्य दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी मंगळ व नेपच्यून असे

दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करणारे आहेत. भागीदारीत ज्यांचा व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी गैरसमज, संशय अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. महिन्याच्या उत्तरार्धात येथील मंगळ या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर अधिकच प्रतिकुल होईल व त्यामुळे उष्णताविकार बळावून अनारोग्य होणे, काही मंडळींना मूळव्याधीसारख्या आजाराचा त्रास होणे, छोटेमोठे अपघात होणे, त्यात हाडमोड होणे संभवते. जपा. वीज, पाणी यांच्यापासून धोका असल्याने विजेची उपकरणे सावधानतेने हाताळा. तसेच खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. जलप्रवास करू नका. श्रद्धा असेल तर प्रभु रामचंद्राची व श्रीहनुमानाची उपासना करा. दररोज रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीरामरक्षा स्तोत्रा”चे व “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी “ ओम पितराय नमः:” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी “ओम भगाय नमः:” मंत्राचा व ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ ओम आर्यमे नमः: “ मंत्राचा श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या दशम या नोकरी-व्यवसाय स्थानी राहू व बुध असून महिन्याच्य उत्तरार्धात रवि ग्रह दशम स्थानी येत आहे. राहू व बुध संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल होतील; पण रवि ग्रह महिन्याच्या उत्तरार्धातच अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात कसले तरी भय, चिंता, निराशा, मानहानी, विरोध, मानसिक ताण, अनारोग्य अशापैकी कारणांनी बेचैन व्हाल. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती सुधारेल व खूप मनोनुकुल घटना घडतील. हाती घेतलेल्या कामात यश मिळेल., इच्छाआकांक्षा पूर्ण होतील, अर्थलाभ होईल, मोठ्या अधिकारी मंडळींचा संपर्क लाभेल. त्यामुळे काही मंडळींना प्रतिष्ठा प्राप्त होईल. स्वराशीत बुध असल्याने बौद्धिक-शैक्षणिक कार्यक्षेत्र असणारांना काळ प्रगतिकारक होईल व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. राहूमुळे नोकरीत अधिकार पद मिळणे संभवते. पण या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या केतुमुळे घरात कोणाशी पटणार नाही व त्यामुळे गृहसौख्यात बाधा येऊ शकेल. जपा. शिवाय हा केतु विषभयकारक असल्याने बाहेरचे उघड्यावरचे खाद्यपदार्थ खाऊ नका. भाग्यस्थानी स्वराशीत असलेल्या शुक्र ग्रहामुळे या राशीच्या काही मंडळींना गुरुरूपा लाभेल, तर काही मंडळींना थोरकृपा, सुसंगती लाभेल. काही मंडळींना प्रसिद्धी मिळणेही संभवते. या राशीच्या पंचम स्थानी स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्यासोबत गुरु ग्रहही आहे. पण हा गुरु मकर या त्याच्या नीच राशीत असल्यामुळे फारसा अनुकुल होणे संभवत नाही. उलट शनीमुळे बुद्धी संशयी, स्वार्थी, व्यवहारी होणे संभवते. त्यामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना चिकाटीने अभ्यास करूनच अपेक्षित प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मंगळ व नेपच्यून असे दोन ग्रह आहेत. या नेपच्यूनमुळे फसवणुकीचा त्रास होणे संभवते. जपा. काही मंडळींना काल्पनिक चिंता त्रस्त करतील. काहींना उगीचच आजारभावना त्रस्त करील. मंगळ ग्रहामुळे उष्णताविकाराचा आजार होणे संभवते. ताप येणे, अंगावर फोड येणे, रक्तविकार बळावणे, अपप्रचाराचा त्रास होणे, आर्थिक नुकसान होणे संभवते. हृदयविकार असणारांनी मनाचा क्षोभ होणार नाही, याची काळजी घ्यावी. येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर जीवनसाथी/संगिनीचे अनारोग्य, दोघांतही वाद, गैरसमज, भांडणे अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला हर्षल अपघातकारक असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना

व श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "श्रीगणेश अथर्वशीर्षा"चे व "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. तसेच स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः:" मंत्राचा, हस्त जन्मनक्षत्र असणारानी "ओम सूर्याय नमः " मंत्राचा व चित्रा जन्मनक्षत्र असणारानी " ओम त्वष्टे नम: " मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा -** या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत शुक्र व रवि असे दोन ग्रह असून येथील रवि ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी जात आहे. भाग्यस्थानी मिथुन राशीत राहू व बुध आहेतच. त्यामुळे या संपूर्ण महिन्याच्या काळात हे तिन्ही ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे अनारोग्य होणे, रोगप्रतिकारशक्ती कमी होणे, हाती घेतलेल्या कामात दिरंगाई, अडथळे, अपयश येणे, इच्छाआकांक्षा अपूर्ण राहणे, संतति समस्या त्रस्त करणे, भावनेच्या भरात भरकटत जाणे, असह्य मानसिक ताण होणे, मानहानी होणे, वरिष्ठांचा विरोध सहन करावा लागणे अशापैकी त्रास होणे संभवते. राहूमुळे प्रवासयोग येतील. पण शुक्रामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होईल. काही मंडळींना वारसा हक्काने असा धनलाभ होईल. या राशीच्या तृतीय स्थानी धनु राशीत केतू असून तो मनस्तपदायकच होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर राशीत शनि व गुरु असे दोन ग्रह आहेत. शनी ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे गृहसौख्यात बाधा येणे संभवते. माता असेल तर तिला अनारोग्य ग्रासेल. गुरु ग्रह अनुकुल असला तरी तो अशक्त असल्यामुळे अपेक्षित सुखसमाधान मिळणार नाही. उलट नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. ज्यांचे स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार होणार असतील ते समाधानकारक होतीलच याची शाश्वती देता येत नाही. या राशीच्या पंचम स्थानी मंगळ व नेपच्यून असे दोन ग्रह आहेत. पैकी नेपच्यूनमुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होणे संभवते. पण हा नेपच्यून आध्यात्मिक उपासनेस व गूढ संशोधनात्मक अभ्यासास अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण मंगळ ग्रहामुळे संततिविषयक समस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. मुलांपैकी कोणाचे अनारोग्य, कोणाची आचरणविषयक समस्या त्रस्त करील. काही मंडळींना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करील. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. हा मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर अधिकच प्रतिकुल होईल व त्यामुळे अपप्रचाराचा त्रास होणे, अर्थहानी होणे, उष्णताविकार--ताप येणे, अंगावर फोड येणे, रक्तविकार बळावणे -- अशापैकी आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या हर्षलमुळे जीवनसाथी/ संगिनीचे लहरी, विक्षिप्त आचरण, दोघांतील वाद, भांडणे, मतभेद अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे अशांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज स्नान झाल्यावर "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा "चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी " ओम त्वष्टे नमः:" मंत्राचा, स्वाती जन्मनक्षत्र असणारांनी " ओम वायवे नमः:" मंत्राचा व विशाखा जन्मनक्षत्र असणारानी "ओम इंद्राग्नये नमः: " मंत्राचा श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या धनस्थानी केतु असून त्याच्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील. या राशीच्या तृतीय स्थानी गुरु ग्रहासह स्वराशीतील शनि ग्रह आहे. येथील गुरु-शनी हे दोन्ही ग्रह भावंडविषयक चिंता किंवा भावंडाकडून होणारा मनस्ताप सहन करावयास लावतील. असे दिसते. येथील स्वराशीतील शनीमुळे काही मंडळींना अपेक्षित अशी उत्तम नोकरी मिळू शकेल ; तर काहींना अपेक्षित असे आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण शनिसह गुरु ग्रह असला तरी तो नीच राशीत असल्यामुळे तो चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना फारसा अनुकुल होणार नाही. पण या राशीच्या लेखकांपैकी कोणाचे लेखन ग्रंथरूपाने प्रकाशित होण्याची शक्यता आहे. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत मंगळ व नेपच्यून असे दोन ग्रह आहेत. विशेष करून महिन्याच्या पूर्वार्धात हे दोन्ही ग्रह गैरसमज, वाद, भांडणे, असमाधानकारक घटना अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. जपा. पण येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी गेल्यावर वैद्यकीय शिक्षण घेत असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल; पण इतरांना संततिसुखाचे दृष्टीने मनस्ताप देणारा असल्याचाच अनुभव येईल. त्यामुळे काही मंडळींना शारीरिक-मानसिक अनारोग्य होणे संभवते. काही मंडळींना स्थावरविषयक समस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. या राशीच्या गर्भवती स्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांना अनुकुल व पूरक होईल. पण हा हर्षल अनारोग्यकारक असल्यामुळे काही मंडळींना ताप येणे, मनस्थिती चंचल होणे, डोके दुखणे अशापैकी आजार होणे संभवते. सतत अति खोल विचार करू नका. नपेक्षा मेंदूविकाराचा आजार त्रस्त करील. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी महिन्याच्या पूर्वार्धात स्वराशीतील शुक्रासह रवि ग्रह आहे. हा रवि ग्रह अनारोग्यकारक असल्यामुळे काही मंडळींना पोटविकाराचा आजार होणे संभवते. पण तो केंद्रस्थानी असल्याने भाग्योदयकारक होईल. शुक्रामुळे प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील. विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान मिळेल. पतिपत्नीपैकी कोणी कलाकार असल्यास अधिकच सुख मिळेल. या राशीच्या अष्टम स्थानी मिथुन राशीत राहू व बुध हे दोन ग्रह असून ते दोन्ही ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अधिक प्रमाणात अनुकुल व लाभदायक होतील. हाती घेतलेल्या कामात यश मिळेल. अन्य जातिधर्मातील मंडळींशी व्यावसायिक संबंध असणारांना अर्थलाभ होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह अष्टम स्थानी आल्यावर परिस्थिती प्रतिकुल होईल व अनारोग्य, संततिसुखात बाधा, अपयश येणे, भावनेच्या भरात भरकटत जाणे अशापैकी मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज स्नान झाल्यावर “श्रीगणेश अथर्वशीर्षा”चे व रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. शिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम श्रीइंद्राग्नये नम: “ मंत्राचा, अनुराधा जन्मनक्षत्र असणारांनी “ओम श्रीमित्राय नमः:” मंत्राचा व ज्येष्ठा जन्मनक्षत्र असणारांनी “ ओंम इंद्राय नमः:” मंत्राचा श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु -** या राशीच्या प्रथम स्थानी केतू असल्यामुळे सध्या . या राशीची मंडळी अत्यंत गुलहौशी असून ऐषारामात काळ व्यतीत करत असावीत असे वाटते. पण हा केतू वाहनधोकादायक असल्यामुळे या राशीच्या मंडळींनी रस्त्याने सतत सावधानतेने चालावे. वाहन चालवीत असता मोबाईलवर वार्तालाप करू नये. तसेच वाहन नियंत्रित वेगातच चालवावे. राशीच्या धनस्थानी असलेल्या शनि -गुरु ग्रहांपैकी शनि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असून त्याच्यामुळे कुटुंबात अनिष्ट

घटना घडणे संभवते. त्यामुळे कौटुंबिक सुखात बाधा येण्याची शक्यता आहे. त्याशिवाय आर्थिक समस्या त्रस्त करतील. या शनीबरोबर असलेला गुरु ग्रह नीच राशीत असल्यामुळे अशक्त आहे. त्यामुळे तो शुभ असला तरी तो बौद्धिक व संशोधनात्मक कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांना फारसा अनुकुल होईलसे दिसत नाही. त्याच्यामुळे फारसे अनारोग्य होणार नाही व एखाद्याचे लेखन प्रसिद्ध होऊ शकेल. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत मंगळ व नेपच्यून असे दोन ग्रह आहेत. येथील नेपच्यनमुळे मनस्थिती भावनाशील होणे संभवते. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. तसेच गूढ संशोधन कार्यासही हा नेपच्यून अनुकुल होईल. या नेपच्यूनमुळे या राशीच्या काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येणे संभवते. नेपच्यून सोबत असलेला मंगळ महिन्याच्या पूर्वार्धात शुभ व अनुकुल असून त्याच्यामुळे हिम्मत व महत्त्वाकांक्षा वाढेल. हातून काही कर्तबगारी घडेल. प्रवासाचे योग येतील. पण या मंगळामुळे इजा, दुखापत होणे संभवते. जपा. हा मंगळ ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर प्रतिकुल होणे संभवते. त्यामुळे गैरसमज, वाद, अन्य कटकटी, असमाधानकारक घटना अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी हर्षल असून तो उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेले रवि -शुक्र या दोन ग्रहांपैकी महिन्याच्या पूर्वार्धात येथील रवि नोकरी-व्यवसायास पूरक होईल. हितशत्रूंचा पराभव होईल. पण त्याच्यामुळे अनारोग्य होणे संभवते. हृदयविकार असणारांनी जपावे. या स्थानी स्वराशीतील शुक्र असला व अंगी उच्च कला गुण असले तरी त्यात अपेक्षित प्रगती होणे संभवत नाही. तसेच कलागुण दाखविण्यास योग्य संधीही मिळणार नाही. त्यामुळे नैराश्य येऊन काही कलाकार व्यसनाधीन होण्याची शक्यता दिसते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि ग्रह या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर तो अनारोग्यकारक होईल व त्यामुळे काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. जपा. या सप्तम स्थानी राहू व बुध हे दोन ग्रह आहेतच. हे दोन्ही ग्रह प्रतिकुल असून वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते .राहूमुळे या राशीच्या काही मंडळींच्या मनात कपटी विचार येणे संभवते तर काही मंडळींना वाममार्ग धन प्राप्तीचा मोह अस्वस्थ करील. जपा. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मनशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर श्रीशंकराच्या “शिवलीलामृत स्तोत्रा”चे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. तसेच सकाळी स्नान करताना जन्मनक्षत्र मूळ असणारांनी “ओम निऋतये नमः:” मंत्राचा, पूर्वाषाढा जन्मनक्षत्र असणारांनी “ओम उदकाय नमः:” मंत्राचा व उत्तराषाढा जन्मनक्षत्र असणारांनी “ओम श्रीविश्वदेवाय नमः:” मंत्राचा १०८ वेळा श्रद्धेने जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत शनि व गुरु असे दोन ग्रह आहेत. येथील गुरु नीच राशीत असल्यामुळे अशक्त आहे. त्यामुळे तो बौद्धिक व संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना फारसा अनुकुल होण्याची शक्यता दिसत नाही. शनि ग्रह स्वराशीचा असला तरी अनुकुल नसल्याचाच अनुभव येईल. स्वतः:चे किंवा जीवनसाथी/संगिनीचे अनारोग्य, नियोजित कार्यात येणारे अडथळे, अडचणी, कुटुंबातील प्रिय जनांपैकी कोणाचे झालेले दूरत्व अशापैकी कारणांनी अस्वस्थ व्हाल व त्यामुळे नैराश्य येणे संभवते. या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत मंगळ व नेपच्यून असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह आर्थिक दृष्ट्या प्रतिकुल होतील. त्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करतील. शिवाय मंगळ ग्रह अनारोग्यकारक असून या राशीच्या काही मंडळींना उष्णताविकाराचा आजार - डोळे, घसा, मान, दाढ - यांचे आजार होणे संभवते. पण येथील मंगळ

महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर अनुकुल होईल व त्यामुळे धैर्य, हिम्मत, महत्वाकांक्षा वाढेल. हातून काही कर्तबगारीचे कार्य घडून येईल. पण दुखापत, इजा होणे संभवते. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी हर्षल असल्यामुळे मनस्थिती चंचल, अस्वस्थ राहील. त्यामुळे कोणाशी पटणार नाही, आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही, सतत तक्रारी करत राहाल त्यामुळे कुटुंबिक सुखात बाधा येईल व वास्तुसुखही लाभणार नाही. जपा. या राशीच्या पंचम स्थानी स्वतः:च्या वृषभ राशीत शुक्र व रवि असे दोन ग्रह आहेत. येथील शुक्र सर्व प्रकारच्या कलाकार मंडळींना व वेगवेगळे छंद जोपासणाऱ्या मंडळींना अनुकुल होईल व आपल्या कलाछंदाचा मनमुराद आनंद लुटता येईल. पण रवि ग्रह अनारोग्यकारक असून नोकरदार मंडळींना मनस्तापदायक होईल. तसेच संततीच्या अनारोग्यामुळे संततीविषयक चिंता त्रस्त करील. पण महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि ग्रह या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर परिस्थितीत सुधारणा होईल व नोकरी व्यवसायास पूरक होईल. हितशत्रूचा त्रास नाहीसा होईल, व शांती लाभेल. या षष्ठ स्थानी राहू व बुध आहेतच. येथील बुध अनुकुल असून नियोजित कार्यात यशदायक होईल. त्यामुळे काही मंडळींना अर्थलाभ व काहींना प्रसिद्धी मिळण्याची शक्यता आहे. पण राहूमुळे आचरण धूर्त, कावेबाज होणे संभवते. पण ज्यांचा अन्य जातिधर्माच्या लोकांशी व्यावसायिक संबंध आहे अशांना अशा संबंधामुळे अधिक लाभ होतील. पण या राहूमुळे विषभय असल्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. काही मंडळींना पोटविकार त्रस्त करतील. या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या केतूमुळे स्वभाव लहरी होईल. श्रद्धा असेल तर "श्री शिवशंकराची उपासना "व "श्रीहनुमान उपासना " मन:शांती देईल . दररोज सकाळी स्नान झाल्यावर " श्रीशिवलीलामृत
स्तोत्रा"चे व रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" मंत्राचा, श्रवण जन्मनक्षत्र असणारांनी "ओम विष्णवे नमः:" मंत्राचा व धनिष्ठा जन्मनक्षत्र असणारांनी "ओम वसवे नमः:" मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम स्थानी मंगळ व नेपच्यून असे दोन ग्रह आहेत. नेपच्यूनमुळे या राशीच्या मंडळींची मनस्थिती अतिशय कोमल झाली असल्यास मानसिक संवेदनाही अति जलद होत असतील. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच मन उदास होऊन नैराश्य असले पाहिजे मंगळ ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. स्वभाव हट्टी, मानी, अहंकारी, मानापमान फार असणारा असा होणे संभवते. त्यामुळे अकारण दगदग, श्रम, शरीरपीडा होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात आर्थिक समस्या त्रस्त करतील. शिवाय उष्णताविकाराचा एखादा आजार होण्याची शक्यता जाणवते. या राशीच्या तृतीय स्थानी हर्षल असून तो उच्च बौध्दिक शक्ती, स्मरणशक्ती व आकलन शक्ती असणारांना, बौद्धिक संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी रवि व शुक्र असे दोन ग्रह आहेत. पैकी रवि ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. अनारोग्य, हाती घेतलेल्या कामात येणाऱ्या अडचणी व त्यामुळे होणारी दिरंगाई, दु:ख, चिंता, निराशा, कौटुंबिक त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरीत वरिष्ठांचा त्रास, संततीपैकी कोणाच्या अनारोग्याची समस्या, प्रियजनांपासून होणारा दुरावा अशापैकी कारणांनी मन अस्वस्थ होईल. शिवाय अपघात भय आहेच. या राशीच्या पंचम स्थानी राहू व बुध असे दोन ग्रह आहेत. राहूमुळे विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. पण दलाली, कमिशनवर

व्यवसाय करत असणारांना हा राहू लाभदायक होईल. बुध ग्रहही प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या लाभस्थानी केतू असून तो अनुकूल व सुखकारक होईल. प्रवासाचे योग येतील. या राशीच्या व्ययस्थानी मकर राशीत शनि व गुरु असे दोन ग्रह आहेत. येथील गुरु नीच राशीत असल्याने अनुकुल होणार नाही. त्यामुळे कौटुंबिक त्रास, अपेक्षाभंग सहन करावा लागेलसे दिसते. शनीमुळे मानहानी, आर्थिक समस्या, अनारोग्य अशी संकटपरंपराच त्रस्त करील. श्रद्धा असेल श्रीशिव शंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान करताना जन्मनक्षत्र धनिष्ठा असणारानी " ओम वसवे नम: " मंत्राचा, शततारका जन्मनक्षत्र असणारांनी "ओम वरुणाय नमः:" मंत्राचा आणि पूर्वा भाद्रपदा जन्मनक्षत्र असणारांनी "ओम अजैक चरणाय नमः":मंत्राचा १०८ वेळा श्रद्धेने जप करावा. तसेच स्नान झाल्यावर "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करावे. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करावे.

**(१२) मीन -** या राशीच्या व्ययस्थानी मंगळ व नेपच्यून असून येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम स्थानी जात आहे. त्यामुळे हा मंगळ या महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. मनस्थिती अस्वस्थ राहील. आर्थिक चिंता त्रस्त करतील. वाद, भांडणे, मानहानी होणे संभवते. मानापमान फार व स्वभाव हट्टी असल्यामुळे महिन्याच्या उत्तरार्धात अकारण शरीरपीडा होणे, श्रम, दगदग होणे संभवते. नेपच्यूनमुळे चिंता व मानसिक व्यग्रता येऊन नैराश्य येईल. या राशीच्या धनस्थानी हर्षलसारखा विक्षिप्त ग्रह असल्यामुळे स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी होणे संभवते. त्यामुळे विक्षिप्त आचरण घडणे संभवते. अविचाराने वाटेल तसा खर्च होईल. आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमान होत आहे हेही लक्षात येणार नाही. या राशीच्या तृतीय स्थानी रवि व शुक्र असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी जात आहे. त्यामुळे तो महिन्याच्या पूर्वार्धातच अनुकुल, आरोग्यदायक, सुखकारक व लाभदायक होईल. शिवाय शुक्र ग्रहही अनुकुल असल्यामुळे जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करा, नोकरीत वरिष्ठ आपल्या कामावर प्रसन्न होतील. काही मंडळींना बढती, काहींना मानाचे स्थान किंवा एखादे उच्च पद मिळणेही संभवते. शुक्रामुळे काही मंडळींना प्रतिष्ठा, भूमिलाभ व धनलाभ होण्याची शक्यता आहे. या राशीच्या चतुर्थ स्थानी राहू व बुध असून येथील राहू कौटुंबिक सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह चतुर्थ स्थानी आल्यावर परिस्थिती अधिकच प्रतिकुल होईल व त्यामुळे कौटुंबिक त्रास व कटकटी अधिकच वाढण्याची शक्यता दिसते. पण बुधामुळे धननाश झाला तरी काही प्रमाणात गृहसौख्य व मित्रसुख मिळू शकेल. या राशीच्या दशम स्थानी केतू असल्यामुळे काही मंडळींना हातचे कार्यक्षेत्र सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी तसे करू नये. आहे त्या कार्यक्षेत्रातच संयमाने वागून काळ व्यतीत करावा. तेच सुखाचे होईल. या राशीच्या लाभस्थानी मकर राशीत शनि व गुरु असे दोन ग्रह आहेत. येथील शनि सर्वसाधारण शुभ असून त्याच्यामुळे अर्थलाभ होणे संभवते. पण तो संततिसुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. गुरु ग्रह अनुकुल असला तरी तो नीच राशीत असल्यामुळे अशक्त आहे. त्यामुळे तो अपेक्षा काही प्रमाणातच पूर्ण करू शकेल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. त्यासाठी दररोज स्नान झाल्यावर "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा भाद्रपदा आहे त्यांनी "ओम अजैकचरणाय नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी " ओम अहिर्बुध्न्याय नमः" मंत्राचा व रेवती जन्मनक्षत्र असणारानी "ओम पूषाय नमः:" मंत्राचा श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

=======ooooo0ooooo=====